नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग

बृहन्मुंबई

जा.क्र.उसंनर/बृमुं/कलम ३७ (१अेअे)/फेरबदल/अर्ज क्रमांक १६१/९५६ इन्सा हटमेंट, 'ई' ब्लॉक,

आझाद मैदान, महापालिका मार्ग,

मुंबई-४०० ००१

दूरध्वनी क्र. २२६२०९३१

Email_ddtpgr mumbai@rediffmail.com


दिनांक :- १९ /०७/२०१३.

प्रति,

श्री.आर.चतुवेदी,सदस्य M.C.H.I.
CREDAI मेकर भवन-II चौथा मजला,
न्यू मरिन लाईन्स,
मुंबई ४०० ०२०.

**विषय** - **महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,१९६६**
बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ विनियम ३३(५)
मध्ये कलम ३७ (१अेअे) अन्वये प्रस्तावित फेरबदलाची सूचना.

**संदर्भ** - १) शासन नगर विकास विभाग नोटीस क्र.टिपीबी-४३०९/१२३/
प्र.क्र.-४७/२०१३/नवि-११, दि.०४-०५-२०१३.
२) आपले दिनांक २०/०६/२०१३ चे पत्र.

महोदय,

विषयांकित प्रकरणी संदर्भाधिन नमूद महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाची दि.०४-०५-२०१३ रोजीची नोटीस महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक - कोकण विभागीय पुरवणी मध्ये दि.२३-२९ मे, २०१३ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१अेअे) मधील तरतुदीनुसार सदर नोटीस प्रसिध्द करण्यांत आली असुन शासनाने उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांची कलम १६२ अन्वये अधिकारी म्हणुन नेमणुक केली आहे.

सदर प्रकरणी शासनाने निर्गमित केलेल्या संदर्भ क्र.१ मधील नोटीशीच्या अनुषंगाने विषयांकित प्रकरणी प्रस्तावित फेरबदला संबंधी आपणाकडील हरकत/सूचना पत्र संदर्भ क्र.२ नुसार या कार्यालयास प्राप्त झाले आहे.

त्यानुसार आपणांस उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई हे सुनावणी देणार आहेत. तेव्हा **दि.२३/०७/२०१३ रोजी दुपारी ३.३० वाजता उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई, कार्यालय इन्साहटमेंट, आझाद मैदान, महापालिका मार्ग, मुंबई - ४०० ००१** येथे सुनावणीसाठी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित रहावे ही विनंती.

सदर सुनावणीसाठी आपण उपस्थित न राहिल्यास प्रकरणी आपले अर्जाव्यतिरिक्त काही म्हणणे नाही असे गृहीत धरुन त्यानुसार शासनास अहवाल सादर करण्यांत येईल.

आपला,

उपसंचालक, नगर रचना,
बृहन्मुंबई यांचे करिता